**मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत १२१ ग्रामपंचायतींच्या बांधकामास मंजुरी प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: ग्रापंई-२०१८/प्र.क्र.९१/बांधकाम-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
तारीख: २४ सप्टेंबर, २०१८

<u>वाचा :-</u>

१) **शासन निर्णय क्रमांकः ग्रापंई-२०१७/प्र.क्र.२४६/बांधकाम-४, दि.२३ जानेवारी, २०१८**
२) **शासन निर्णय क्रमांकः ग्रापंई-२०१८/प्र.क्र.९१/बांधकाम-४, दि.३० जून, २०१८**
३) **शासन निर्णय क्रमांकः ग्रापंई-२०१८/प्र.क्र.९१/बांधकाम-४, दि.०३ ऑगस्ट, २०१८**

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी “मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना” संदर्भीत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. ग्रामीण भागासाठी पायाभूत सुविधांची असणारी आवश्यकता व त्यासाठी उपलब्ध असणाऱ्या स्तोत्रांची मर्यादा विचारात घेऊन मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतंर्गत १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या व स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नसलेल्या अशा १२१ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतंर्गत १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या व ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा १२१ ग्रामपंचायतींना स्वत:चे ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यास शासन निर्णय क्र.ग्रापंई-२०१७/ प्र. क्र. २४६/ बांधकाम-४, दि.२३ जानेवारी, २०१८ मधील अटींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत असून सदर ग्रामपंचायतींची यादी सोबत प्रपत्र-अ मध्ये देण्यात आली आहे.

२. सोबतच्या प्रपत्र-अ मधील १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींनी या योजनेमधून त्यांच्या कार्यालयाचे बांधकाम करावयाचे असल्यास प्रथम ग्रामसभेचा ठराव करुन शासनाने निश्चित केलेल्या बांधकाम मुल्यांच्या १०% इतकी रक्कम स्वनिधीतून भरण्यास तयार असल्याचे प्रमाणित करावे. सदर ग्रामपंचायतींनी वरीलप्रमाणे ठराव संमत केल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतीची लोकसंख्या १००० पेक्षा कमी असल्याची व स्वत:चे कार्यालय उपलब्ध नसल्याची खात्री केल्यानंतर जिल्हा परिषदेने अंतिम मंजूरी प्रदान करावी.

३. ग्रामपंचायतींनी त्यांच्या कार्यालयाचे बांधकाम शासन निर्णय क्र.ग्रापंई-२०१३/प्र.क्र.१८९/ पंरा-७, दि.३०.०१.२०१४ अन्वये तयार केलेल्या प्रचलित आराखड्यानुसार करणे आवश्यक राहील.

४. या योजनेतंर्गत अंतिमत: निवड करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यालयाच्या बांधकामासाठी निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने ९०% च्या मर्यादेत जिल्हा परिषदांमार्फत निधी वितरित करण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०९२४१४४०३२९७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2018.09.24 15:52:18 +05'30'

**(दि. बा. पाटील)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक
५. सर्व विभागीय आयुक्त

६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१०.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
११.सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग
१२. सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३.सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्ह परिषद
१४. सर्व कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद
१५. निवड नस्ती, कार्यासन बांधकाम-४, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.

**प्रपत्र - "अ"**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | सिन्नर | बोरखिंड |
| २ | | | आटकवाडे |
| ३ | | | दत्तनगर (दापुर) |
| ४ | | | मऱ्हळ खु. |
| ५ | | | सुरेगाव |
| ६ | | | श्रीरामपुर(शिंदेवाडी) |
| ७ | | इगतपुरी | टाकेद खु. |
| ८ | | | अडसरे खु. |
| ९ | | नाशिक | यशवंतनगर |
| १० | जळगाव | पारोळा | उडणी दिगर |
| ११ | अहमदनगर | नेवासा | लेकुरवाळा आखाडा |
| १२ | | | राजेगांव |
| १३ | ठाणे | शहापूर | टेंभुर्ली |
| १४ | रत्नागिरी | मंडणगड | निगडी |
| १५ | पुणे | खेड | अहिरे |
| १६ | | | आसखेड खु. |
| १७ | | | एकलहरे |
| १८ | | | वराळे |
| १९ | | | परसुल |
| २० | | | आसखेड बु. |
| २१ | | पुरंदर | खेंगरेवाडी |
| २२ | सातारा | पाटण | बांधवट |
| २३ | | खटाव | अनफळे |
| २४ | | | गुंडेवाडी |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| २५ | **सांगली** | आटपाडी | कामथ |
| २६ | | | धावडवाडी |
| २७ | | तासगाव | धोंडेवाडी |
| २८ | | | पानमळेवाडी |
| २९ | | मिरज | मानमोडी |
| ३० | | | रसुलवाडी (किसानपूर) |
| ३१ | | जत | वासान |
| ३२ | | खानापूर | शेडगेवाडी |
| ३३ | | | भडकेवाडी |
| ३४ | | शिराळा | शिंदेवाडी |
| ३५ | | | शिवरवाडी |
| ३६ | **सोलापूर** | माढा | शिंगेवाडी |
| ३७ | | | जाखले |
| ३८ | | | महादेववाडी |
| ३९ | | | गवळेवाडी |
| ४० | **औरंगाबाद** | पैठण | कावसान |
| ४१ | | | जांभळी |
| ४२ | | कन्नड | जवखेडा |
| ४३ | | | तेलवाडी |
| ४४ | | औरंगाबाद | मोरहिरा |
| ४५ | | फुलंब्री | ममनाबाद |
| ४६ | **नांदेड** | देगलूर | भायेगाव |
| ४७ | | | दरेगाव |
| ४८ | | देगलूर | **टाकळी ज.** |
| ४९ | | बिलोली | गळेगाव |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| ५० | नांदेड | बिलोली | एकडकी खु. |
| ५१ | | | टाकळी खु. |
| ५२ | | कंधार | जाकापूर |
| ५३ | | | मादाळी |
| ५४ | | | गुट्टेवाडी |
| ५५ | | | सोमठाणा |
| ५६ | | | गांधीनगर |
| ५७ | | हिमायतनगर | बळीराम तांडा |
| ५८ | | | कासारवाडी |
| ५९ | | मुखेड | चिवळी |
| ६० | | | भाटापूर |
| ६१ | | हदगाव | कोळगाव |
| ६२ | | अर्धापूर | खैरगाव बु. |
| ६३ | | | आगराबाद तांडा |
| ६४ | | | जांभरुण |
| ६५ | | | शहापूर |
| ६६ | | | पांगरी |
| ६७ | | | कारवाडी |
| ६८ | | भोकरदन | ताडकळस |
| ६९ | | | कोठा-दाभाडी |
| ७० | | जाफराबाद | सोनगिरी |
| ७१ | जालना | जालना | बोरखेडी |
| ७२ | | | हिगवन |
| ७३ | | | कचरेवाडी |
| ७४ | | बदनापूर | राजणगाव |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| ७५ | **जालना** | अंबड | सोनक पिंपळगाव |
| ७६ | | | भिवंडी बोडखा |
| ७७ | **हिंगोली** | औंढा-नागनाथ | जोडपिंपरी |
| ७८ | | | गढाळा |
| ७९ | | | फुलदाभा |
| ८० | **परभणी** | गंगाखेड | मसनेरवाडी |
| ८१ | | | बेलवडी |
| ८२ | | | अर्बुजवाडी |
| ८३ | | पालम | रोकडेवाडी |
| ८४ | | जिंतूर | कौडगांव |
| ८५ | **बीड** | परळी | परचुंडी |
| ८६ | | धारुर | वरकटवाडी |
| ८७ | | | पांगरी |
| ८८ | | केज | पळसखेडा |
| ८९ | | | काशीदवाडी |
| ९० | | अंबाजोगाई | धावडी |
| ९१ | | माजलगाव | ढोरगाव |
| ९२ | | | ब्रम्हगाव |
| ९३ | | | मनुरवाडी |
| ९४ | **लातूर** | अहमदपूर | चिलखा |
| ९५ | | उद्गीर | तिवटग्याळ |
| ९६ | **बुलढाणा** | सिंदखेडा राजा | अमनगाव |
| ९७ | **यवतमाळ** | पुसद | शेलु (खु.) |
| ९८ | | | चौधरा |
| ९९ | | महागांव | भोसा |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| १०० | **नागपूर** | कुही | चिकणा |
| १०१ | | | माळणी |
| १०२ | | भिवापुर | सालेभट्टी(दंदे) |
| १०३ | | काटोल | राऊळगाव |
| १०४ | | नरखेड | दिंदरगाव |
| १०५ | **चंद्रपूर** | मुल | गोवर्धन |
| १०६ | | चंद्रपूर | चेक निंबाळा |
| १०७ | | भद्रावती | मनगाव |
| १०८ | | | मासळ |
| १०९ | **वर्धा** | देवळी | दिगडोह |
| ११० | | | तळनी खांदेराव |
| १११ | | आर्वी | बोदद |
| ११२ | | | तळेगाव (र.) |
| ११३ | **अकोला** | अकोला | जलालाबाद |
| ११४ | | अकोट | अटकळी |
| ११५ | | | टाकळी |
| ११६ | **अमरावती** | वरुड | वंडली |
| ११७ | | चिखलदरा | आढाव |
| ११८ | **गडचिरोली** | आरमोरी | सायगाव |
| ११९ | | चार्मोशी | मारोडा |
| १२० | **गोंदिया** | देवरी | मिसपिरी |
| १२१ | | सालेकसा | निंबा |

------***------